




दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com


|| आजचा सुविचार ||

एखादा देश आणि त्याची नैतिक मुल्ये
किती महान आहेत, हे तिथल्या प्राण्यांना
कशी वागणूक देतात त्यावरूनही कळून येते.

– महात्मा गांधी


वर्ष : ०६ | अंक : २२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.०५ सप्टेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056





# शेतकऱ्यांच्या नावे ७४ कोटींचे कर्ज !

## नुकसानभरपाईच्या आमिषाने फसवणूक

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, नागपूर :** शेतकऱ्यांच्या नावे भारतीय स्टेट बँकेकडून तब्बल ७४ कोटी रुपयांचे कर्ज घेऊन फसवणूक करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीच्या सूत्रधाराला नागपूर ग्रामीण पोलिसांच्या आर्थिक गुन्हेशाखेने सापळा रचून रेल्वेस्थानकावर अटक केली. सचिन खुशाल कारमोरे (वय ४०, रा. नेरी, ता. मोहाडी, जि. भंडारा) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सचिन आणि त्याचे साथीदार नागपूर जिल्ह्यातील गरीब व अशिक्षित शेतकऱ्यांना हेरत होते. शासनाकडून शेतपिकांच्या नुकसानीपोटी दहा हजार रुपये मिळणार असल्याचे आमिष दाखवून ते शेतकऱ्यांकडून आधारकार्ड, पॅनकार्ड, सात-बारा उतारे यांसह आवश्यक दस्तऐवज घेत होते. त्यानंतर इंग्रजीतील कागदपत्रांवर शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आणि अंगठ्याचे ठसे घेतले जात होते. याच कागदपत्रांच्या आधारे शेतकऱ्यांच्या नावे कर्ज उचलण्यात आले. सचिन आणि त्याच्या साथीदारांनी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मौदा शाखेतून ५४ कोटी ६९ लाख ४२ हजार ८५० रुपये, तर रामटेक शाखेतून १९ कोटी १३ लाख ५० हजार रुपये, असे एकूण ७३ कोटी ८२ लाख ९२ हजार ८५० रुपयांचे कर्ज घेतल्याचे समोर आले आहे. ही रक्कम बनावट कंपन्यांच्या खात्यांत वळती करण्यात आली. कर्जवसुलीसाठी बँकांनी संबंधित शेतकऱ्यांना नोटिसा बजावल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला.

या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी तपास आर्थिक गुन्हेशाखेकडे सोपविला. पोद्दार आणि अपर पोलिस अधीक्षक अनिल म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हेशाखेच्या उपअधीक्षक पूजा गायकवाड, निरीक्षक योगेश कामाले आणि त्यांच्या पथकाने सचिन व त्याच्या साथीदारांचा शोध सुरू केला. सचिन बुधवारी रेल्वेने बाहेर जाणार असून तो नागपूर रेल्वेस्थानकावर असल्याची माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार सापळा रचून त्याला अटक करण्यात आली.

**सचिन धान घोटाळ्यातीलही आरोपी...**

सचिन कारमोरे हा भंडारा, गडचिरोली आणि अहेरी येथील कोट्यवधी रुपयांच्या धान घोटाळ्यातीलही आरोपी आहे. गेल्या महिन्यात उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने त्याचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला होता. तेव्हापासून पोलिस त्याचा शोध घेत होते.

## दुष्काळाच्या छायेत जिंतूर-सेलू; विजय भांबळेंचा शेतकऱ्यांसाठी आवाज

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.०४, जिंतूर (परभणी) :** मागील २ महिन्यांहून अधिक काळ पावसाने दडी मारल्याने जिंतूर-सेलू परिसरातील शेतकऱ्यांसमोर गंभीर संकट उभे राहिले आहे. खरीप हंगामातील पिकांना आवश्यक वेळी पाऊस न मिळाल्याने अनेक भागांतील पिके सुकण्याच्या मार्गावर आहेत. कर्ज काढून, मोठ्या अपेक्षेने आणि मेहनतीने केलेली पेरणी आता वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे. या गंभीर परिस्थितीची तातडीने दखल घेऊन शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी माजी आमदार विजय भांबळे यांनी केली आहे.जिंतूर तालुक्यासह सेलू परिसरात यंदा मोठ्या प्रमाणावर सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, हळद, ऊस, कांदा, राजमा तसेच विविध फळबागांची लागवड करण्यात आली आहे. पेरणीनंतर सुरुवातीला समाधानकारक पाऊस झाल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. मात्र, त्यानंतर पावसाने प्रदीर्घ विश्रांती घेतल्याने जमिनीतील ओलावा कमी झाला असून पिकांची वाढ खुंटली आहे. काही ठिकाणी पिके अक्षरशः सुकण्याच्या अवस्थेत पोहोचली आहेत.

**कर्ज काढून पेरणी; आता उत्पादनाची चिंता...**

बियाणे, खते, कीटकनाशके, मशागत, मजुरी आणि इतर शेती खर्चासाठी शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च केला आहे. अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून खरीप हंगाम उभा केला. मात्र पावसाच्या लांबलेल्या खंडामुळे पिकांचे नुकसान होण्याची शक्यता वाढली आहे. त्यामुळे शेतीवरील खर्चही निघणार नाही आणि कर्जाची परतफेड कशी करायची, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे.पावसाची परिस्थिती आणखी काही दिवस अशीच राहिल्यास खरीप पिकांच्या उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

**जिंतूर तालुका कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करा...**

या पार्श्वभूमीवर माजी आमदार विजय भांबळे यांनी प्रशासनाकडे जिंतूर तालुका कोरडा दुष्काळग्रस्त घोषित करण्याची मागणी केली आहे. तसेच सेलू तालुक्यातील पावसाची व पिकांची परिस्थिती लक्षात घेऊन दोन्ही तालुक्यांना दुष्काळी मदतीच्या कक्षेत आणावे, अशी मागणी करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना मदत मिळण्यासाठी केवळ पंचनामे, अहवाल आणि कागदोपत्री प्रक्रियेत वेळ जाऊ नये. प्रत्यक्ष परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी भूमिका भांबळे यांनी मांडली आहे.

**सरसकट हेक्टरी २५ हजारांची मदत द्या...**



पावसाच्या खंडामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी २५ हजार रुपये आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. फळबागांचे नुकसान मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता असल्याने फळबाग उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी ४० हजार रुपये मदत देण्यात यावी.ही मदत पंचनाम्यांच्या जाचक प्रक्रियेत अडकवून न ठेवता पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट जमा करण्यात यावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

रखडलेला पीक विमा तातडीने द्या

मागील वर्षाचा खरीप आणि रब्बी हंगामातील रखडलेला पीक विमा अद्याप अनेक शेतकऱ्यांना मिळालेला नसल्याची बाबही निवेदनातून प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आली. हा विमा तातडीने वितरित करावा, तसेच चालू वर्षाच्या खरीप हंगामात पावसाच्या खंडामुळे निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेऊन पीक विम्याची अंतरिम मदत तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

**वीज बिलात सवलत, कर्जवसुलीला स्थगिती...**

दुष्काळी परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी वीज बिलात सवलत अथवा माफी देण्यात यावी. तसेच शेतकऱ्यांच्या कर्जवसुलीस काही काळासाठी स्थगिती देऊन बँका व वित्तीय संस्थांना त्याबाबत आवश्यक निर्देश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.शेतकऱ्यांना शेतीपंपासाठी सुरळीत वीजपुरवठा, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि दुष्काळी परिस्थितीत शासनाकडून मिळणाऱ्या इतर सवलती तातडीने लागू कराव्यात, अशी मागणी ही करण्यात आली आहे.

**प्रशासनाने प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करावी...**

जिंतूर-सेलू परिसरातील अनेक गावांमध्ये पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे शेतीचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महसूल, कृषी आणि संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष शेतांमध्ये जाऊन परिस्थितीची पाहणी करावी. केवळ कागदोपत्री आकडेवारीवर निर्णय न घेता शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष अडचणी समजून घेऊन शासनाकडे तातडीने अहवाल पाठवावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

## वाहतूक कोंडीविरोधात केसनंद ग्रामस्थ आक्रमक !

**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.०४, हवेली (पुणे) :** पुणे-नगर हायवे व सोलापूर हायवेला जोडणाऱ्या बायपास रस्त्यामुळे आणि वाघोली-राहू रस्त्यावरील वाढत्या वाहनांच्या संख्येमुळे केसनंद (ता. हवेली) गावात दररोज भीषण वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधून ठोस उपाययोजना करण्यासाठी केसनंद ग्रामपंचायतीचे प्रशासक यांच्या वतीने जिल्हाधिकारी, पीएमआरडीए, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पोलीस प्रशासनाला निवेदन देण्यात आले आहे. प्रशासनाने त्वरित उपाययोजना न केल्यास २७ सप्टेंबर रोजी भव्य जनआंदोलन उभारून 'रास्ता रोको' आणि ८ ऑक्टोबर पासून आमरण उपोषण करण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

निवेदनात म्हंटले आहे की, केसनंद हे गाव पुणे महानगरपालिकेच्या हद्दीलगत असल्याने येथे मोठ्या प्रमाणावर नोकरदार वर्ग स्थायिक झाला आहे. सध्या गावाची लोकसंख्या सुमारे १ लाखाच्या घरात पोहोचली असून पूर्व भागातील शेतकरी आपला शेतीमाल नेण्यासाठी याच मार्गाचा वापर करतात. त्यामुळे केवळ केसनंदच नव्हे, तर परिसरातील तब्बल १५ गावांना या वाहतूक कोंडीचा चा मोठा फटका बसत आहे. शाळा-महाविद्यालयांचे विद्यार्थी, कामगार आणि आपत्कालीन सेवांना (ॲम्ब्युलन्स) या कोंडीमुळे तासनतास अडकून पडावे लागत आहे.

**– निवेदनातील प्रमुख मागण्या :**

मुख्य चौकातील दर्गाशेजारील जुन्या मोरीचे बॅरिकेट काढून टाकावी.
गावातील मुख्य चौकातील अतिक्रमणे आणि विजेचे खांब त्वरित काढण्यात यावेत.
छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये पीएमआरडीए मंजूर साईट मार्जिननुसार रस्ता रुंदीकरण करावे.
वाहतूक नियोजनासाठी केसनंद येथे कायमस्वरूपी ६ ट्रॅफिक वॉर्डन नियुक्त करावेत.
निधी मंजूर असलेल्या वाघोली-राहू रस्त्याचे काम त्वरित सुरू करावे, खड्डे बुजवावेत.
पीएमआरडीएच्या नवीन व जुन्या आराखड्यानुसार (आरपी, डीपी, व्हीआर) रस्ते ताब्यात घेऊन विकसित करावेत.

मागील चार वर्षापासून विविध शासकीय विभागांना निवेदने देऊनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे ग्राम पंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी आणि ग्रामस्थांनी विविध प्रशासकीय कार्यालयांत जाऊन अधिकाऱ्यांची भेट घेत निवेदने सुपूर्द केली. प्रशासनाने या रास्त मागण्यांची वेळेत दखल न घेतल्यास नाईलाजास्तव रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

## बोरीत कावड यात्रा उत्साहात संपन्न

**अक्षराज : जफर शेख**

**दि.०४, बोरी (परभणी) :** जिंतूर तालुक्यातील बोरी येथील दत्त नगर ते जिंतूर येथील मैनापुरी महादेव मंदिर पर्यंत निघालेली कावड यात्रा दिनांक ०३ सप्टेंबर २०२६ रोजी मोठ्या उत्साहात व धार्मिक वातावरणात संपन्न झाली.दत्त नगरच्या शिवछत्रपती चौक येथे पूजा व आरती झाल्यानंतर कावड यात्रेला प्रारंभ झाला. मोंढा रोड, ग्राम पंचायत चौक, मेन रोड, बस स्टॅन्ड, जिंतूर रोड मार्गे ही कावड यात्रा निघाली. चांदज या गावात भजन व प्रसाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मैनापुरी येथील महादेव मंदिरात कावडीया यांच्या हस्ते जलाभिषेक तसेच आरती करुन या यात्रेचा समारोप झाला. यानंतर भाविकांनी प्रसादाचा लाभ घेतला. या कावड यात्रेत दत्त नगर व गावातील



महिला, पुरुष व शिवभक्त तरुणांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

## संपादकीय

### मराठवाड्यावर दुष्काळाचे सावट

'एल निनो' सक्रिय झाल्यामुळे देशभरात कमी पावसाचा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने व्यक्त केला होता. त्यानुसार यंदा मराठवाडा आणि विदर्भात कमी पावसामुळे अनेकविध प्रश्न निर्माण केले आहेत. पावसाचा अभाव फक्त शेती क्षेत्राचे नुकसान करणारा नसतो, तर उद्योग-व्यवसायालाही झळ सोसावी लागते. एका वर्षाचा दुष्काळ शेतकऱ्याला तीन वर्षे मागे नेतो. दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट, वादळ अशा संकटांनी शेतीला घेरलेले आहे. जागतिक हवामान बदलाची झळ अशी स्थानिक पातळीवरही जाणवत आहे. या पार्श्वभूमीवर यंदाची परिस्थिती चिंताजनक आहे.

मराठवाड्यात जून ते ऑगस्टपर्यंत केवळ ३८२ मिलिमीटर पाऊस झाला आहे. सरासरी ५१३ मिलिमीटर पाऊस अपेक्षित होता. परिणामी, खरीप पिके हातातून जाण्यास सुरुवात झाली आहे. राज्यातील १८ जिल्ह्यांमध्ये पावसाची तूट आहे. त्यात मराठवाड्यातील पाच जिल्हे आहेत. लातूर जिल्ह्यात आतापर्यंत सरासरी ५०५ मिमी पाऊस अपेक्षित असताना २९४ मिमी पाऊस झाला. धाराशिव जिल्ह्यात ४०३ मिमी अपेक्षित असताना ३०१ मिमी, परभणी ५७० मिमी अपेक्षित असताना केवळ ३६० मिमी, बीडमध्ये सर्वात कमी २८३ मिमी पावसाची नोंद झाली आहे. सप्टेंबर महिन्यात पाऊस झाला तरी वाढती तूट भरून निघेल का, असा प्रश्न आहे. पाऊस नसल्यामुळे पिकांवर कीड आणि अळीचा प्रादुर्भाव झाला आहे. मागील काही वर्षांत यंदाची ही कीड सर्वांत गंभीर असल्याचे कृषी अभ्यासक सांगतात.

मराठवाड्यात यावर्षी खरीपाची ९३ टक्के क्षेत्रावर पेरणी झाली. कधीकाळी कापसाचे सर्वाधिक क्षेत्र असलेल्या मराठवाड्यात पावसाअभावी कापसाचे क्षेत्र घटले आहे. मका आणि सोयाबीन पिकांनी त्याची जागा व्यापली आहे. कमी कालावधीतील पिकांची लागवड करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले होते. त्यानुसार विभागातील खरीप हंगामाचा पोत पूर्णपणे बदलला आहे. सद्यस्थितीत पावसाअभावी सोयाबीन, मका, तूर, कपाशी ही पिके कोमेजली आहेत. पिके वाढीच्या अवस्थेत असताना पावसाने दडी मारल्यामुळे शेतीच्या अर्थकारणाला मोठा फटका बसणार आहे. पावसाळ्याचे तीन महिने उलटूनही विहिरी, कूपनलिका, शेततळी, पाझर तलाव, लघु प्रकल्प आणि मध्यम प्रकल्पात पुरेसा पाणीसाठा नाही. विभागातील ९१७ प्रकल्पांत ५२.६८ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. ७८० लघु प्रकल्पांत २०.१२ टक्के पाणीसाठा आहे. मोठ्या धरणांमुळे पाणीसाठ्यात वाढ दिसत असून लघु आणि मध्यम प्रकल्पात पाणी नाही. विभागातील ४९ धरणे कोरडी आहेत.

खरीप हंगामासह फळबागा आणि ऊसशेती या अर्थकारणाला चालना देणाऱ्या पिकांनाही पाणी टंचाईची झळ बसली आहे. मागील वर्षी दोन लाख ६७ हजार हेक्टरवर ऊसलागवड झाली होती. या वर्षी ४३ हजार ८२१ हेक्टर लागवड झाली आहे. छत्रपती संभाजीनगर विभागाचे क्षेत्र एक लाख ३९ हजार ७९८ असून त्यापैकी २६ हजार ८२९ म्हणजेच १९ टक्के लागवड झाली आहे. तर लातूर विभागाचे क्षेत्र एक लाख ८४ हजार २७१ असून १६ हजार ९९२ हेक्टर म्हणजेच नऊ टक्के लागवड झाली आहे. ऊस लागवडीत घट झाल्यामुळे साखर कारखाने कसे चालणार हा प्रश्न आहे. साखर उत्पादन घटल्यास शेतीसह कारखानदारीवर अवलंबून असलेल्या घटकांच्या अर्थकारणावर गंभीर परिणाम होणार आहे. राज्यातील मोसंबीचे आगार असलेल्या छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यांतील फळबागा कशा टिकवणार, असा प्रश्न भेडसावत आहे.

राज्य सरकारने 'एल निनो'च्या पार्श्वभूमीवर पूर्वतयारी करताना उपाययोजना जाहीर केल्या होत्या. जिल्हास्तरावर कृतिगट नेमणे, 'जलयुक्त शिवार-२' योजना प्रभावीपणे राबविणे, चारा पिकांना प्राधान्य देणे, जलसाठा वाढवून काटेकोर पाणीवापर करणे अशा कामांचा त्यात समावेश होता. मात्र, योजनेची प्रभावी अंमलबजावणी नसल्याचे उदासवाणे चित्र आहे. त्यामुळे ऐन दुष्काळात सामान्यांची होरपळ होण्याची भीती आहे. रब्बी हंगामात कडधान्य बियाण्यांसाठी अनुदान देण्याची घोषणा सरकारने केली आहे. प्रत्यक्षात परतीच्या पावसावर रब्बी हंगाम अवलंबून आहे. परतीचा पाऊसही दर वर्षीच्या तुलनेत तुरळक असेल, असे हवामान अभ्यासकांनी म्हटले आहे. जनतेची मागणी आणि सरकारी योजनांतील तफावत कमी करण्याची गरज आहे. तरच दुष्काळ काही प्रमाणात सुसह्य होऊ शकेल. पुढील दोन महिन्यांत रोजगारासाठी मराठवाड्यातून स्थलांतर सुरू होण्याची शक्यता आहे. स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी आक्रसल्या जातील. या संकटात भरीव निधी आणि प्रभावी धोरणाची गरज आहे.

– अतुल पांडे

# विद्यार्थ्यांच्या हृदयात स्थान मिळविणारे आदर्श शिक्षक

शिक्षणतज्ज्ञ आणि उत्कृष्ट शैक्षणिक कार्य करणारे विचारवंत डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जयंती दिन ५ सप्टेंबर भारतात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. शिक्षकदिनाचे औचित्य साधून भारतात गुणवंत आणि आदर्श शिक्षकांना विविध स्तरांवर आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन शिक्षकांचा यथोचित असा सन्मान केला जातो. ५ सप्टेंबरला शासनाच्या वतीने राष्ट्रीय स्तरावर, राज्यस्तरावर, जिल्हास्तरावर आणि तालुकास्तरावर आदर्श शिक्षक पुरस्कारांचे वितरण केले जाते. तसेच विविध सामाजिक,शैक्षणिक व सांस्कृतिक संस्था शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट शैक्षणिक कार्य करणाऱ्या गुणवान, आदर्श व कर्तृत्ववान शिक्षकांचा सन्मान करतात.शिक्षकदिनाच्या निमित्ताने एवढ्या मोठ्या प्रमाणात शिक्षकांचा सन्मान केला जातो.यावरुन शिक्षक पदाचे मोठेपण सिद्ध होते. आता काळ बदलला आहे,नवीन तंत्रज्ञान विकसित झाले आहे,एआय ने माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणला आहे.तरीही चांगले शिक्षण देणाऱ्या, चांगले संस्कार रूजवणाऱ्या व जीवनाचे ध्येय गाठण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करणाऱ्या आदर्श शिक्षकांचे महत्त्व कायम अबाधित राहणार आहे.

शिक्षक दिन म्हटला की आम्हाला आमच्या आदर्श शिक्षकांची आठवण हमखास होते.भारतात व महाराष्ट्रात आजवर अनेक आदर्श शिक्षक होऊन गेले. पण शिक्षक दिनाच्या निमित्ताने महात्मा ज्योतिबा फुले,सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर,साने गुरूजी, महर्षी धोंडो केशव कर्वे,गोपाळ कृष्ण गोखले,लोकमान्य टिळक,कर्मवीर भाऊराव पाटील व अनुताई वाघ यांच्या उत्कृष्ट अध्यापन कार्याची आठवण समस्त शिक्षक बंधू भगिनींना प्रेरणा देत राहते.यांच्या शैक्षणिक व अध्यापन कार्यामुळे शिक्षक पदाचे महत्त्व नेहमी लक्षवेधक व अधोरेखित ठरले आहे. विद्यार्थ्यांच्या



सर्वांगीण विकासासाठी, गुणवत्ता वाढीसाठी,विद्यार्थ्यांचे जीवन घडविण्यासाठी नेहमी क्रियाशील असणाऱ्या शिक्षकांची देशाला आणि समाजाला फार गरज आहे. विद्यार्थ्यांना अचूक व नेमके मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनाचे ध्येय गाठण्यासाठी अहोरात्र झटणारे शिक्षक,

स्वतः निर्व्यसनी राहून विद्यार्थ्यांना संस्काराची शिदोरी देणारे शिक्षक, विज्ञानाचे महत्त्व पटवून देऊन अंधश्रद्धा निर्मूलन करणारे शिक्षक व विद्यार्थ्यांचे कलागुण ओळखून त्यांना आवडीच्या क्षेत्रात करिअर करण्यासाठी सल्ला देणारे शिक्षक,पदरमोड करून गरीब विद्यार्थ्यांना वह्या पुस्तके देणारे शिक्षक आणि गरीब,हुशार,अभ्यासू व होतकरू विद्यार्थ्यांची परीक्षा फी भरणारे शिक्षक आजच्या काळात देशासाठी व समाजासाठी फार मोठे योगदान देत आहेत.देशाचे उज्ज्वल भविष्य घडवीत आहेत.अशा गुणवान,कर्तृत्ववान आणि आदर्श शिक्षकांचा कोणालाही सार्थ अभिमान वाटतो.

जि.प.प्रशाला खंडाळी ता.अहमदपूर जि.लातूर या शाळेच्या मुख्याध्यापक पदावर कार्य करत असताना शिक्षक दिनाच्या निमित्ताने मला माझ्या आदर्श शिक्षकांची आठवण झाल्याशिवाय राहत नाही.गंगाधरराव मोरे,भाऊराव डोंगरे,व्यंकटराव घुमाडे,श्री समांधे सर या शिक्षकांनी आम्हाला प्राथमिकचे दर्जेदार शिक्षण दिले. आमचा शैक्षणिक पाया मजबूत केला.त्यानंतर माध्यमिकचे शिक्षण घेताना अनेक निर्व्यसनी,उत्कृष्ट व कर्तृत्ववान शिक्षकांचा सहवास लाभला.अप्पाराव लोहारे,अनंतराव बोरोळे,बंकटराव गरड, गणेशराव गुळवे गुरुजी,संभाजीराव परगे,रामराव सोमवंशी,श्यामराव शेकडे या आदर्श शिक्षकांनी आम्हाला गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले.म्हणून माझ्या सारख्या अनेक सामान्य विद्यार्थ्यांना जीवनात उच्च पदावर उल्लेखनीय कार्य करण्याची संधी मिळाली आहे.या आमच्या आदर्श शिक्षकांना आम्ही विद्यार्थी या नात्याने आमच्या हृदयात कायम आदराचे स्थान दिले आहे. शिक्षण क्षेत्रात शिक्षक व मुख्याध्यापक पदावर कार्य करताना अनेक आदर्श, गुणवान व निर्व्यसनी सहकारी शिक्षकांचा सहवास लाभला.हणमंत कमलापुरे,रामचंद्र देमगुंडे,विश्वनाथ गंगोत्री,अनंतराव धुळशेट्टे,माधव वाघमारे ,शिवदास माटोरे,कार्तिक घाटीवाले, बळीराम काकडे,शिवराज गोरगे, संजीवन जाधव,राजकुमार चाटे,धनंजय उजनकर,मारोती रुद्रावाड,एकनाथ पलमटे,अंकुश आडे,विलास आगलावे, बालाजी वाघमारे या आदर्श शिक्षकांसोबत अध्यापन करताना अनेक चांगल्या गोष्टी शिकता आल्या.या सर्व शिक्षकांनी त्यांच्या उत्कृष्ट शैक्षणिक कार्यामुळे विद्यार्थ्यांच्या हृदयात आदराचे स्थान निर्माण केले आहे. त्याचबरोबर महादेवी हुडगे,मंदोदरी सुरनर,मनकर्णा राठोड,निर्मला नागरगोजे,शांताताई भोसले,गयाबाई लहाने,सावित्राताई कांबळे,अयोध्याताई घोगरे,सत्यभामा मद्देवाड,इंदुमती गुट्टे, मुक्ताताई कांबळे,कोंडाबाई जाधव आणि जयश्रीताई फुलसे या माझ्या सहकारी शिक्षिकांचे शैक्षणिक कार्य उल्लेखनीय व आदर्श घेण्यासारखे आहे.भरत जाधव सर चौथी वर्गाला अध्यापन करतात पण त्यांनी शाळेत वृक्षारोपण मोहीम राबवली आहे आणि उत्कृष्ट परसबाग तयार केली आहे. संजय पालकुर्तावार सर विज्ञान विषयाचे अध्यापन करतात पण शाळेची सगळी ऑनलाईन कामे पार पाडतात. विनायक दराडे सर इंग्रजीचे प्रभावी अध्यापन करतात व विद्यार्थ्यांना शिस्तीचे व संस्काराचे धडे शिकवतात. भगवानराव केंद्रे सर मराठी व हिंदी भाषा विषय उत्कृष्टपणे शिकवतात आणि प्रभावी कथा सांगतात,उत्कृष्ट गायन करतात.बालाजीराव नाईक इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया मजबूत करतात.ज्येष्ठ शिक्षक रमेश कासले,उत्तमराव घोडके आणि उध्दवराव साळवे यांचेही शैक्षणिक कार्य चांगले आहे.

पुस्तकी ज्ञानाबरोबरच विद्यार्थ्यांना व्यावसायिक व व्यवहारिक ज्ञान देणारे शिक्षक,विद्यार्थ्यांचे कलागुण ओळखून त्यांना व्यासपीठावर नेणारे शिक्षक, विद्यार्थ्यांना विज्ञान तंत्रज्ञान आणि पर्यावरणाचे महत्त्व पटवून सांगणारे शिक्षक आणि जीवनभर शिक्षकी पेशाला डाग लागणार नाही याची खबरदारी घेणारे शिक्षक वंदनीय ठरतात .अशा कर्तव्यनिष्ठ आदर्श शिक्षकांना आपला आदर्श मानणारे विद्यार्थी आपल्या आदर्श शिक्षकांना स्वतःच्या हृदयात कायमस्वरूपी आदराचे स्थान देतात.विविध क्षेत्रांत मोठ्या पदावर कार्यरत असणारे विद्यार्थी शिक्षकांनी कमावलेली खरी संपत्ती असते.शिक्षक दिनाच्या निमित्ताने आपल्या उत्कृष्ट अशा शैक्षणिक कार्याने विद्यार्थ्यांच्या हृदयात कायमस्वरूपी आदराचे स्थान मिळवणाऱ्या सर्व शिक्षक बंधू भगिनींना मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

**– बबन दामोदर गुळवे**
**मुख्याध्यापक, जि.प.प्रशाला खंडाळी**
**ता.अहमदपूर जि.लातूर**
**मो.९७३०९३९७३२.**

# सार्वजनिक गणेशोत्सवामागील उद्देश आणि वास्तव !

सार्वजनिक गणेशोत्सव म्हणजे केवळ श्री गणेशाची मूर्ती आणून ती एखाद्या सार्वजनिक स्थळी स्थापन करणे, एवढेच डोळ्यांसमोर न येता त्यासमवेत त्याची सजावट, त्या निमित्ताने होणारे सार्वजनिक कार्यक्रम आदी अनेक गोष्टी आपसूकच नजरेसमोर येतात. आजमितीला सार्वजनिक गणेशोत्सव केवळ मुंबई, ठाणे आणि पुणेपुरता मर्यादित राहिला नसून राज्यातील सर्वात मोठा उत्सव बनला आहे.

राज्य सरकारने यंदा गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा दिला आहे. महाराष्ट्रासह अन्य राज्यांतही गणेशोत्सव उत्साहाने साजरा होऊ लागला आहे. यानिमित्ताने राज्याच्या अर्थकारणात दरवर्षी मोठ्या प्रमाणात उलाढाल



होत असते. शहरासारख्या ठिकाणी या दिवसांत एवढ्या मोठ्या प्रमाणात भाविकांची वर्दळ असते की कधी रात्र सुरु झाली आणि कधी संपली याचा पत्ताही लागत नाही. शहरातील सार्वजनिक गणेशोत्सवाची मजा लुटण्यासाठी देश विदेशातून भाविक आणि पर्यटक मोठ्या प्रमाणात शहरांत दाखल होतात. देशाच्या सीमा ओलांडून साता समुद्रापार ज्या ज्या ठिकाणी मराठी माणूस वसला आहे त्या त्या ठिकाणी सार्वजनिक गणेशोत्सव आज साजरा होऊ लागला आहे. मुळात 'कुटुंबातील मंडळींनी एकत्र येऊन साजरा करायचा एक सण असलेली श्री गणेशचतुर्थी सार्वजनिक उत्सव कशी बनली', हे समजून घेऊया.

सार्वजनिक गणेशोत्सवाचे प्रणेते म्हणून लोकमान्य टिळक यांना ओळखले जाते. एकदा लोकमान्य टिळकांनी ह.भ.प. श्रीपतीबुवा भिंगारकर यांना विचारले, 'मी स्वराज्यप्राप्तीसाठी प्रयत्न करीत आहे; पण ईश्वरी साहाय्यावाचून कोणतेही कार्य शेवटास जात नाही. तेव्हा या स्वराज्याच्या कार्याचा राष्ट्रभर प्रसार होण्यासाठी कोणाची आराधना करावी ?' बुवा म्हणाले, 'तुम्ही श्री गणपतीची पार्थिव पूजा चालू करा, म्हणजे तुमचे सर्व हेतू सिद्धीस जातील.' त्यावर लोकमान्य टिळक म्हणाले, 'मी एकट्याने अशी पूजा करून भागणार नाही. राष्ट्रभर ती सर्वांनी केली पाहिजे. आपल्याकडे भाद्रपद शुद्ध चतुर्थीस घरोघर पार्थिव गणपतीची पूजा करायचा पूर्वीचा प्रघात आहेच. तो आता राष्ट्रभर चालू करूया.' तेव्हापासून लोकमान्यांच्या प्रेरणेने सार्वजनिक गणेशोत्सव चालू झाला ! यावरून आपल्याला 'सार्वजनिक गणेशोत्सव चालू होण्यामागील मूळ प्रेरणा राष्ट्रहित आणि ईश्वरभक्ती ही आहे', हे स्पष्ट होते.

'सार्वजनिक गणेशोत्सव चालू करण्यामागील आपले उद्देश कोणते आहेत', हे लोकमान्य टिळकांनी तेव्हाच एका भाषणात स्पष्ट केले. वर्ष १८९४ मध्ये झालेल्या त्यांच्या भाषणाचा सार म्हणजे 'धर्मजागृती, राष्ट्रजागृती आणि पाश्चिमात्य संस्कृतीच्या आक्रमणाचा विरोध', हे सार्वजनिक गणेशोत्सव चालू करण्यामागील मुख्य उद्देश होत. आता मनात प्रश्न येतो की, हे उद्देश आज कालबाह्य झाले आहेत का ? सध्या किती जणांमध्ये या उद्देशांचे भान आहे ? सध्या किती ठिकाणी या उद्देशांना अनुरूप ठरेल, अशा प्रकारे हा उत्सव साजरा केला जात आहे ? ज्या प्रकारे तो साजरा केला जात आहे, त्यात काही चुकत आहे का ? जे चुकत आहे, त्यामागील कारणे कोणती आणि त्यात सुधारणा कशी करता येईल ? हे आजचे ज्वलंत प्रश्न आहेत. आज अनेक ठिकाणी गणेशोत्सवासाठी वर्गणी काढताना जबरदस्ती केली जाते. काहींची आर्थिक क्षमता नसताना समाजात इतरांसोबत राहायचे म्हणून त्यांना पदरमोड करून वर्गणी द्यावी लागते. काही ठिकाणी मंडळातील कार्यकर्ते हा समजूतदारपणा दाखवतात; मात्र काही ठिकाणी नागरिकांना वर्गणी देण्यासाठी त्रास दिला जातो हे नाकारता येणार नाही. मुळात हिंदूंमध्ये ऐक्य निर्माण करण्यासाठी सुरु केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाच्या मूळ उद्देशालाच आज हरताळ फासला जात आहे. वर्षागणिक निरनिराळी मंडळे स्थापन होऊ लागली आहे.

शहरांत १०० मीटरच्या परिसरातही २-३ मंडळे स्थापन झालेली पाहायला मिळतात. जवळजवळच्या मंडळांमध्ये सजावट, गणेश मूर्तीची उंची, उत्सवानिमित्त ठेवण्यात आलेले कार्यक्रम, आगमन-विसर्जन मिरवणूका अशा वेगवेगळ्या कारणांमुळे भांडणे होताना पाहायला मिळतात. ज्या ठिकाणी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी जमते अशा मंडळांच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्सवादरम्यान भलताच उत्साह संचारलेला असतो. या उत्साहाच्या भरात आलेल्या भाविकांशी वाद घालणे, त्यांना शिवीगाळ करणे असले प्रकार या काळात हल्ली बातम्यांमध्येही पाहायला मिळू लागले आहेत. भाविकांना आकर्षित करण्यासाठी मंडपात उंच गणेशमूर्ती बसवली जाते; मात्र अनंत चतुर्दशीला तिचे पूर्ण विसर्जन न करताच कार्यकर्त्यांकडून पळ काढला जातो. ज्या गणेशमूर्तीची १० दिवस मनोभावे पूजा केली जाते, त्याच मूर्तीची पुढे अवहेलना होते. सजावट, विद्युत रोषणाई यांवर अमर्याद खर्च केला जातो.

मिरवणुकांमध्ये मंगलवाद्ये वाजवण्याऐवजी अथवा सात्विक गाणी किंवा भजने लावण्याऐवजी जीवघेणा डीजे लावून त्यावर चित्रविचित्र अंगविक्षेप करत नृत्य केले जाते. आगमन विसर्जन मिरवणुकीत सहभागी होणाऱ्यांकडून काही ठिकाणी मद्यपान केले जाते. सार्वजनिक गणेशोत्सवाचे निमित्त करून काही ठिकाणी गणेश मंडपातच रात्री जुगाराचा डाव बसतो. या दिवसांत विधायक आणि समाजोपयोगी प्रबोधनात्मक कार्यक्रम ठेवण्याऐवजी काही ठिकाणी लावणी अथवा चित्रपट संगीताचे कार्यक्रम ठेवले जातात.

या कालावधीत गणेश मंडपातील वातावरण सात्विक राहण्यासाठी सुमधुर भजने अथवा गणरायाची गाणी, स्तोत्र लावण्याऐवजी कर्णकर्कश आवाजात चित्रपट गीते लावली जातात. आरत्या म्हणताना त्या मंजुळ आवाजात न म्हणतात आरडाओरड करत म्हटल्या जातात. श्रीच्या मंडपात स्वच्छता ठेवली जात नाही.

श्री गणेशाच्या हा उत्सव सार्वजनिक असला तरी तो धार्मिक उत्सव आहे. राष्ट्रकार्याला धार्मिक अधिष्ठान असावे आणि त्यातून राष्ट्रजागृतीचा संदेश लोकांपर्यंत पोहोचावा या उद्देशाने लोकमान्य टिळकांनी हा उत्सव सुरु केला. आजमितीला हा उद्देश लोप पावून उत्सवात अपप्रवृत्ती शिरल्या आहेत. अर्थात वर नमूद केलेले प्रकार हे काही ठिकाणीच पाहायला मिळत असले तरी ते आपल्या धार्मिक उत्सवाला गालबोट लावणारे असल्याने ते थांबायला हवेत. आज हिंदूंमध्ये धर्मशिक्षणाचा अभाव असल्याने उत्साहाच्या भरात ते काय करत आहेत हे त्यांच्याच लक्षात येत नाही. आपल्या उत्सवात शिरलेल्या या चुकीच्या प्रथांना उखडून उत्सव सात्विक आणि लोकहिताचा व्हावा यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करण्याची आज नितांत आवश्यकता आहे.

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

### शिक्षक

आईचे रूपचं दुसरे
वंदनीय गुरूशिक्षक
घडवी निरोगी पिढी
बने संस्कृती रक्षक

गुरू समर्थ खरोखर
चालतेबोलतेपुस्तक
उपकार त्याचे अनंत
सहज झुके मस्तक

शिकवण येई कामा
बनतो संकटी रक्षक
भार आपला पेलतो
अदृष्य बनूनि तक्षक

दुरुनि पाहतो प्रगती
असा खासअधिक्षक
कवच कुंडल शिष्या
भिंत जणू रे संरक्षक

गुरुवीण शून्य सगळे
बनतो कपाळमोक्षक
डोळ्यांसमोर सरेसारे
होई स्थितप्रज्ञ प्रेक्षक

तावून सुलाखून काढे
सतर्कससक्त परिक्षक
प्रगति विचार छात्राचा
असे नअन्य पर्यवेक्षक

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज



## थोडक्यात बातम्या

# देवस्थान ही श्रद्धेसह संस्कृतीची केंद्रे - आ.दाते
## खातगाव टाकळी येथे सभामंडप लोकार्पण



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, पारनेर (अहिल्यानगर) :** धार्मिक श्रद्धा आणि विकासकामांचा सुंदर संगम घडवत तिर्थक्षेत्र विकास निधी अंतर्गत खातगाव टाकळी येथील गोरक्षनाथ मंदिराच्या २५ लक्ष रुपये निधीतून सभामंडपाचे लोकार्पण पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या सभामंडपामुळे मंदिरातील धार्मिक कार्यक्रम, भजन-कीर्तन, प्रवचन तसेच विविध सामाजिक उपक्रमांसाठी ग्रामस्थांना चांगली सुविधा उपलब्ध झाली आहे.

यावेळी बोलताना आमदार काशिनाथ दाते म्हणाले, देवस्थान ही आपल्या श्रद्धेची केंद्रे असण्याबरोबरच गावच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. गोरक्षनाथ मंदिराच्या सभामंडपामुळे ग्रामस्थांची अनेक वर्षांची गरज पूर्ण झाली आहे. या परिसरातील धार्मिक परंपरा जपत विकासकामांना चालना देणे, हीच आपली भूमिका आहे.

मतदारसंघाचा विकास हा केवळ एका गावापुरता मर्यादित न राहता प्रत्येक गावाच्या गरजेनुसार झाला पाहिजे. रस्ते, पाणी, सिंचन, मंदिर परिसर, सभामंडप, मूलभूत सुविधा अशा विविध कामांना शासनाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देत अनेक कामे सुरू आहेत, तर काही कामे पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना पाण्याचा शाश्वत आधार मिळावा, यासाठी उपसा सिंचन योजनांसह मोठ्या जल प्रकल्पांच्या पाठपुराव्याला ही प्राधान्य दिले जात आहे, असे त्यांनी सांगितले.

मतदारसंघात रस्ते व दळणवळणाची कामे, विविध देवस्थानांच्या सभामंडपांची कामे, मंदिर परिसर सुशोभीकरण, पाणी व सिंचनाशी संबंधित प्रकल्प तसेच गावनिहाय मूलभूत सुविधांची कामे टप्प्याटप्प्याने मार्गी लावली जात आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील विकासाला अधिक व्यापक स्वरूप मिळत असून, स्थानिक नागरिकांच्या मागण्यांना प्राधान्य देण्याचा प्रयत्न केला जात आहे. यावेळी बापु सोनवणे, सरपंच रुथा वैराळ, उपसरपंच धीरज कुलट, ह.भ.प. आदिनाथ कुलट गुरुजी, ह.भ.प. सर्जेराव जपे गुरुजी, मिटूशेठ कुलट, ज्ञानेश्वर पठारे, नवनाथ ताकपेरे, उत्तमराव कुलट, सुदर्शन कुलट, सुनील कुलट, सोपान पठारे, अतुल कुलट, अमित सातपुते, रमेश कुलट, बबन सातपुते, आबासाहेब कुलट, रंगनाथ कुलट, छबुराव काडेकर, श्रीकांत कर्डिले साहेब आदी मान्यवरांसह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिरपूर पटेल विद्यालयात श्रीकृष्ण जन्माष्टमी व गोपाळकाला साजरा

**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.०४, शिरपूर (धुळे) :** शिरपूर येथील आर.सी.पटेल मराठी प्राथमिक शाळा, शिरपूर येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी व गोपाळकाला उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात बालवाडी ते इयत्ता चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेचे मुख्याध्यापक प्रदीप गहीवरे यांनी श्रीकृष्णाच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले.विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णाच्या बाललीला, राधा-कृष्णाच्या वेशभूषा तसेच विविध सांस्कृतिक सादरीकरणातून उपस्थितांची मने जिंकली. चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या मनमोहक वेशभूषेमुळे संपूर्ण शाळेचे वातावरण कृष्णमय झाले.श्रीकृष्णाच्या गोविंदा आला रे आला या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. विद्यार्थ्यांनी पारंपरिक पद्धतीने गोपाळकाल्याचे महत्त्व जाणून घेत आनंदाने या उत्सवात सहभाग घेतला. सामूहिक सहभाग, एकोप्याची भावना आणि आनंदाचे वातावरण यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.यावेळी विद्यार्थ्यांना श्रीकृष्ण जन्माष्टमीचे धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक महत्त्व समजावून सांगण्यात आले. एकीमध्ये शक्ती आणि सहभागातून आनंद हा संदेश विद्यार्थ्यांनी या उपक्रमातून अनुभवला. बालवाडी ते इयत्ता चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, आकर्षक वेशभूषा आणि आनंदी वातावरण यामुळे श्रीकृष्ण जन्माष्टमी व गोपाळकाला कार्यक्रम संस्मरणीय ठरला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील शिक्षकवृंद व सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

# मनसे आक्रमक; सुपा-पारनेर रस्ता २२ मीटर करा व अतिक्रमणे हटवा; तहसीलदार, PWD ला निवेदन




**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०४, सुपा (अहिल्यानगर) :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पारनेर तालुकाप्रमुख अविनाश पवार यांनी नुकतेच पारनेरचे तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी आणि सार्वजनिक बांधकाम विभाग, पारनेरचे कार्यकारी अभियंता यांना निवेदन दिले. सुपा चौक ते एमआयडीसी चौक या रस्त्याचे २२ मीटर रुंदीकरण करून अहिल्यानगर-पुणे महामार्गावर सुपा येथील अतिक्रमणे तातडीने हटविण्याची मागणी त्यांनी केली.

सुपा हे १० ते १५ गावांसाठी मध्यवर्ती व मोठी बाजारपेठ असून शाळा, कॉलेज, बँका, एमआयडीसी असल्याने येथे रहदारी कित्येक पटीने जास्त आहे. रस्ता अरुंद व खड्डेमय झाल्याने दोन्ही बाजूला मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याने रस्ता निम्म्यावर आला आहे. यामुळे दररोज प्रचंड वाहतूक कोंडी होत असून शाळेच्या बसेस, विद्यार्थी तासन्तास अडकून पडतात. लहान-मोठे अपघात वाढले आहेत.

सदर दोन्ही मागण्यांकडे तात्काळ लक्ष न दिल्यास, भविष्यात होणाऱ्या कोणत्याही अपघातास व वाहतूक कोंडीस प्रशासन जबाबदार राहील. सुपा रस्ता २२ मीटर व अतिक्रमणमुक्त होईपर्यंत मनसे शांत बसणार नाही, मनसे स्टाईलने तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा अविनाश पवार यांनी दिला. यावेळी सुपा शहर अध्यक्ष अक्षय सूर्यवंशी, पारनेर शहर अध्यक्ष सतीश म्हस्के, तालुका उपाध्यक्ष विरेंद्र थोरात यांच्यासह मनसे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




# निलंबन करा अन्यथा आमरण उपोषण

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, पुणे :** पुणे महानगरपालिकेच्या सुरक्षा व्यवस्थेशी संबंधित कंत्राटामध्ये तब्बल ५ कोटी ५९ लाख रुपयांचा कथित आर्थिक घोटाळा झाल्याचा गंभीर आरोप येरवडा भागातील सामाजिक कार्यकर्ते रोहित सिद्धेश्वर मदने यांनी केला आहे. मे. ह्युमन मॅट्रिक्स सिक्युरिटीज कंपनी आणि संबंधित नियंत्रण अधिकाऱ्यांच्या भूमिकेची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणात घनकचरा विभागाचे उप आयुक्त संतोष वारुळे यांच्यावर निलंबनाची कारवाई करून संबंधितांविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी ही मदने यांनी केली आहे.

मदने यांनी दिलेल्या अंतिम स्मरणपत्रानुसार, करारातील अटींनुसार आवश्यक असलेले ९९ कर्मचारी प्रत्यक्षात तैनात करणे बंधनकारक होते. मात्र, ईपीएफच्या नोंदींमध्ये केवळ ५८ ते ६३ कर्मचाऱ्यांचे योगदान जमा करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे. उर्वरित कर्मचारी केवळ कागदोपत्री दाखवून पालिकेकडून लाखो रुपयांची बिले वसूल करण्यात आल्याचा गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

तसेच पीएफ पोर्टलवर कामगारांच्या नावावर तब्बल १,१३० विनापगारी सुट्ट्यांच्या नोंदी करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. करारातील कलम १६.१ नुसार गैरहजर कर्मचाऱ्यांबाबत प्रतिदिन एक हजार रुपयांचा दंड आकारणे अपेक्षित असतानाही हा दंड वसूल करण्यात आला नसल्याचा मदने यांचा दावा आहे. त्यामुळे पालिकेच्या तिजोरीचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

किमान वेतनाच्या नियमांचेही उल्लंघन झाल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. पालिकेकडून वॉर्ड सुपरवायझर पदासाठी मोठ्या प्रमाणात मानधन आकारण्यात आले, मात्र संबंधित कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात अत्यल्प रक्कम जमा करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. उपस्थिती पत्रकांमध्ये कथित फेरफार करून प्रोजेक्ट डायरेक्टर पदाच्या मोबदल्याबाबतही गैरव्यवहार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या सर्व प्रकरणाची माहिती असूनही संबंधित बिलांना मंजुरी देण्यात आल्याचा आरोप उप आयुक्त संतोष वारुळे यांच्यावर करण्यात आला आहे. मदने यांनी वारुळे यांच्यावर पदाचा गैरवापर केल्याचा आरोप करत त्यांना तातडीने निलंबित करण्याची मागणी केली आहे. कंपनीचे मुख्य मालक, व्यवस्थापनातील संबंधित अधिकारी तसेच पालिकेतील संबंधित अभियंते आणि अधिकाऱ्यांविरोधात फसवणूक, बनावट कागदपत्रे तयार करणे, तोतयागिरी आणि आर्थिक गैरव्यवहारासह फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, मे. ह्युमन मॅट्रिक्स सिक्युरिटीज कंपनीचे कंत्राट तात्काळ रद्द करून सुरक्षा ठेव जप्त करावी आणि कंपनीला काळ्या यादीत टाकावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

प्रकरणात तातडीने कारवाई न झाल्यास सोमवार, ७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजल्यापासून पुणे महानगरपालिका मुख्य इमारतीसमोर निरंतर आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा अंतिम इशारा रोहित मदने यांनी दिला आहे. या गंभीर आरोपांमुळे पुणे महापालिकेच्या कारभारावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, आता पालिका प्रशासन, संबंधित अधिकारी आणि कंपनी या आरोपांवर काय भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# वेदिका ताईंच्या मंगळागौरीचा साज - २०२६; परंपरेचा आनंद आणि महिलांसाठी मोकळा श्वास

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०४, देसाई तळेपाडा (ठाणे) :** श्रावण म्हटला की मंगळागौरीचा सण आणि महिलांच्या चेहऱ्यावरचा आगळावेगळा आनंद आलाच. संसाराचा गाडा सांभाळताना रोजच्या धकाधकीतून, घरातील कामे बाजूला ठेवून दोन क्षण मोकळा श्वास घेण्याची संधी म्हणजे मंगळागौर. हाच आनंद द्विगुणित करण्यासाठी आपल्या नगरसेविका वेदिका साहिल पाटील यांनी वेदिका ताईंच्या मंगळागौरीचा साज - २०२६या भव्य मंगळागौरी उत्सवाचे आयोजन केले आहे.

आपली संस्कृती, परंपरा आणि आनंद याचा त्रिवेणी संगम असलेल्या या उत्सवाचे आयोजन रविवार, दि.०६ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी ३:०० ते सायं. ६:३० वाजेपर्यंत मातोश्री मंगल कार्यालय, तळेपाडा, देसाई येथे करण्यात आले आहे. यावेळी पारंपरिक मंगळागौरीचे खेळ, झिम्मा, फुगडी, गोफ असे एकापेक्षा एक बहारदार खेळ सादर केले जाणार आहेत. हे सर्व खेळ खेळताना महिलांच्या चेहऱ्यावर दिसणारा निरागस आनंद आणि माहेरपणाची उभारी पाहण्यासारखी असते. रोजची कामे विसरून एकत्र येऊन मनसोक्त आनंद लुटण्याची ही पर्वणीच ठरणार आहे.

**स्पर्धेचे स्वरूप आणि आकर्षक बक्षिसे :-**

या उत्सवात जास्तीत जास्त १० महिलांचा एक ग्रुप सहभागी होऊ शकतो. प्रत्येक ग्रुपसाठी सादरीकरणाची वेळ १० मिनिटे असणार आहे. सहभागासाठी मराठी पारंपरिक वेशभूषा अनिवार्य असून प्रवेश पूर्णपणे मोफत ठेवण्यात आला आहे.

**विजेत्या ग्रुपसाठी रोख रकमेची आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.**

- प्रथम पारितोषिक - ११,१११ रुपये
- द्वितीय पारितोषिक - ७,७७७ रुपये
- तृतीय पारितोषिक - ३,३३३ रुपये

तसेच ५ भाग्यवान महिलांसाठी लकी ड्रॉ द्वारे पैठणी साडी भेट म्हणून दिली जाणार आहे. आपली संस्कृती जपूया, परंपरा पुढे नेऊया आणि मंगळागौरीचा आनंद एकत्र साजरा करूया,

या उद्देशाने आयोजित केलेल्या या सोहळ्यास सर्व महिलांनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजिका नगरसेविका वेदिका साहिल पाटील (नगरसेविका, ठाणे महानगरपालिका) आणि साहिल बाळाराम पाटील (जिल्हाध्यक्ष - भाजपा अभियंता प्रकोष्ठ, ठाणे) यांनी केले आहे.

सहभागासाठी नोंदणी सुरू असून लवकरात लवकर आपल्या ग्रुपची नोंदणी करा. नोंदणीसाठी संपर्क : ९२२४४१८०८१

# पनवेल महानगरपालिका तायक्कांडो अकादमीने पटकावले सर्वसाधारण विजेतपद



**अक्षराज : संदिप येवले**

**दि.०४, पनवेल (नवी मुंबई) :** रायगड तायक्कांडो असोसिएशनच्या वतीने पनवेल महानगरपालिकेचे लोकप्रिय महापौर मा.नितीन पाटील साहेब यांच्या सन्मानार्थ २५ वी रायगड जिल्हा तायक्कांडो चॅम्पियनशिप २०२६ उत्साहात व दिमाखात पार पडली.या स्पर्धेला रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून ७०० हून अधिक तायक्कांडो खेळाडूंनी सहभाग नोंदविला.

या स्पर्धेचे उद्घाटन कार्यसम्राट व पनवेल चे विधाते विद्यमान आमदार प्रशांत ठाकूर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे माजी सभागृह नेते व विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर तसेच या स्पर्धेचे सत्कार मुर्ती पनवेल चे महापौर नितीनभाई पाटील, सर्व गटाचे सभापती, विरोधी पक्ष नेते अरविंद म्हात्रे, प्रिन्सिपल अनुराग पान्डे, एस.एन.जी इंटरनॅशनल स्कुल ची प्रिन्सिपल डेबोलीनी राय मॅडम आणि सर्व पनवेल महानगरपालिका चे नगरसेवक उपस्थित होते. यावेळी रायगड तायक्कॅन्डो असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून परेश ठाकूर व पनवेल तालुका तायक्कान्डो असोसिएशनचे अध्यक्ष महापौर नितीन भाई पाटील यांची निवड करण्यात आली

या स्पर्धेत सब-ज्युनियर, कॅडेट, ज्युनियर आणि सीनियर अशा विविध वयोगटांमध्ये खेळाडूंनी उत्कृष्ट तायक्कांडो कौशल्याचे प्रदर्शन केले.जिल्ह्यातील विविध तालुक्यातील जिल्हा तायक्कांडो चॅम्पियनशिपमध्ये ७०० हून अधिक खेळाडूंचा सहभाग नोंदवण्यात आला.. स्पर्धेत सब-ज्युनियर, कॅडेट, ज्युनियर आणि सीनियर अशा विविध वयोगटांमध्ये खेळाडूंनी उत्कृष्ट तायक्कांडो कौशल्याचे प्रदर्शन केले. जिल्ह्यातील विविध तायक्कांडो अकादमी आणि क्लबमधून मोठ्या संख्येने खेळाडू सहभागी झाल्याने स्पर्धेला विशेष रंगत आली.

स्पर्धेतील सर्वसाधारण विजेतेपदाची (Overall Championship) ट्रॉफी पनवेल महानगरपालिका तायक्कांडो अकादमीने पटकावली.द्वितीय क्रमांकाची ट्रॉफी कर्जत-खालापूर तालुक्यातील तेजश माळी संचालित ब्लास्टर तायक्कांडो अकादमीने,तर तृतीय क्रमांकाची ट्रॉफी माणगाव तालुक्यातील अक्षय पवार संचलित युनिक तायक्कांडो अकादमीने मिळविली.

रायगड जिल्ह्यात तायक्कांडो खेळाचा प्रसार आणि खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने रायगड तायक्कांडो असोसिएशन सातत्याने विविध स्पर्धांचे आयोजन करीत आहे.या २५ व्या जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेच्या माध्यमातून अनेक नवोदित खेळाडूंना आपले कौशल्य दाखविण्याची संधी मिळाली. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी रायगड तायक्कांडो असोसिएशनचे पदाधिकारी, पंच, प्रशिक्षक,ब्लॅक बेल्ट, स्वयंसेवक, पालक आणि सर्व सहभागी अकादमींनी विशेष मेहनत घेतली.डो अकादमी आणि क्लबमधून मोठ्या संख्येने खेळाडू सहभागी झाल्याने स्पर्धेला विशेष रंगत आली.

# केएलई महाविद्यालयात शाडू मातीच्या गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळा

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०४, पनवेल (नवी मुंबई) :** महानगरपालिकेच्यावतीने माझी वसुंधरा अभियान ७.० अंतर्गत 'उत्सव गणरायाचा, जागर पर्यावरणाचा उपक्रम महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत केएलई महाविद्यालय येथे विद्यार्थ्यांसाठी शाडू मातीच्या गणेशमूर्ती बनविण्याची पर्यावरणपूरक कार्यशाळा आयोजित करण्यात आली.या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना शाडू मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रात्यक्षिक देण्यात आले. पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे महत्त्व, शाडू मातीच्या मूर्तींचे पर्यावरणीय फायदे तसेच गणेशमूर्ती विसर्जनामुळे जलस्रोतांवर होणारा परिणाम याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली. पनवेल महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त बाळाराम रातांबे तसेच केएलई महाविद्यालयाचे मुख्याध्यापक डॉ.विजय डी.मेंढुळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत ही कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचा संदेश दिला.

# ओबीसी आरक्षण बचावासाठी कीर्तनवाडीत आमरण उपोषण सुरू

## प्रल्हाद कीर्तने यांच्या लढ्याला समता परिषदेची साथ; उपोषणकर्ते कीर्तनेंची लोंढे व ढवळे यांनी घेतली भेट

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, पाथर्डी (अहिल्यानगर)** : पाथर्डी तालुक्यातील कीर्तनवाडी व मालेवाडी येथे ओबीसी आरक्षणाच्या मागणीसाठी २९ ऑगस्टपासून उपोषणास बसलेले समाजसेवक प्रल्हाद बाबासाहेब कीर्तने यांच्या उपोषणाचा आज सातवा दिवस आहे. त्यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे अहिल्यानगर (दक्षिण) जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे व महिला जिल्हाध्यक्षा संगीतताई ढवळे यांनी कार्यकर्त्यांसह भेट देत पाठिंबा दर्शविला.

भारतीय संविधानाने मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील ओबीसी समाजाला आरक्षण दिले आहे. या आरक्षणाला कोणत्याही प्रकारे धक्का लागू नये, तसेच ओबीसींच्या हक्काच्या आरक्षणाचे संरक्षण व्हावे, या प्रमुख मागणीसाठी प्रल्हाद कीर्तने यांनी उपोषण सुरू केले आहे.

यावेळी समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष तथा राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष सुभाष लोंढे व महिला तालुकाध्यक्षा संगीतताई ढवळे यांनी उपोषणकर्ते प्रल्हाद कीर्तने यांची भेट घेऊन त्यांच्या मागण्यांना पाठिंबा व्यक्त केला. ओबीसींच्या आरक्षणाच्या हक्कासाठी सुरू असलेल्या




लढ्यात समता परिषद त्यांच्या पाठीशी असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हा कार्याध्यक्ष अनिल गाडीलकर, माजी नगरसेवक रमेश गोरे, पाथर्डी तालुकाध्यक्ष नागनाथ वाळके, श्रीधर भोंगळे, राजेंद्र बनसोडे, शरद गालफाडे, गोरख चेमटे, बाबा गिरी, सतीश वैद्य, ऋषिकेश वैद्य, राम निर्मळ यांच्यासह समता परिषदेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे खासदार धानोरकर यांनी रद्द केली रस्ता सुरक्षा बैठक

## दांडी बहाद्दर अधिकाऱ्यांना ‘कारणे दाखवा नोटीस’ बजावण्याचे



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि. ०४ चंद्रपूर :** जिल्ह्यातील रस्ता सुरक्षेचा प्रश्न अत्यंत गंभीर असताना, आज आयोजित रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीला उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यासह अनेक प्रमुख विभाग प्रमुखांनी दांडी मारल्याने, खासदार प्रतिभा धानोरकर यांनी आक्रमक पवित्रा घेत ही बैठक तात्काळ रद्द केली. लोकप्रतिनिधी व प्रशासकीय शिस्तीचा अनादर करणाऱ्या या सर्व बेजबाबदार अनुपस्थित अधिकाऱ्यांना त्वरित ‘कारणे दाखवा नोटीस’ बजावण्याचे स्पष्ट आदेश त्यांनी समितीच्या सचिव तथा जिल्हाधिकारी वसुमना पंत यांना दिले. या बैठकीला विधान परिषद आमदार सुधाकर अडबाले यांची विशेष उपस्थिती होती.

बैठक रद्द केल्यानंतर खासदार प्रतिभा धानोरकर यांनी थेट शहराच्या मुख्य रस्त्यांवर उतरून पाहणी केली आणि रस्त्यावर अस्ताव्यस्त उभ्या राहणाऱ्या खाजगी ट्रॅव्हल्सवर तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश दिले. खासदार स्वतः रस्त्यावर उतरताच प्रशासनाची धावपळ उडाली व तात्काळ ट्रॅव्हल्सवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. यावेळी शहरात वाहतूक कोंडी टाळण्यासाठी ‘ट्रक टर्मिनल’ साठी राखीव जागा शोधण्याचे आणि खाजगी ट्रॅव्हल्स मालकांना स्वतःची पार्किंग व्यवस्था उभारण्यास सांगण्याचे निर्देश ही त्यांनी दिले.

खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या या अचानक दिलेल्या 'सरप्राईज व्हिजिट' मुळे वाहतूक पोलिसांचा सावळागोंधळ उघडा पडला. खासदार महोदया पाहणीसाठी येत असल्याची माहिती मिळताच वाहतूक निरीक्षक बारापात्रे हे स्वतः ट्रॅव्हल्स मालकांना रस्त्यावरून गाड्या हटवण्याच्या सूचना देत असल्याचे निदर्शनास आले. प्रशासकीय आडोशाखाली चालणारा हा हलगर्जीपणा समोर आल्यानंतर खासदार प्रतिभा धानोरकर यांनी संबंधित यंत्रणेला चांगलेच खडे बोल सुनावले.

जनतेच्या जीवाशी खेळणारा आणि वाहतुकीला अडथळा निर्माण करणारा निष्काळजीपणा अजिबात सहन केला जाणार नाही, असा इशारा देत खासदार प्रतिभा धानोरकर यांनी पुढील बैठकीत सर्व अधिकाऱ्यांची उपस्थिती आणि वाहतूक समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याचे निर्देश दिले.

या धडक कारवाईवेळी सचिव तथा जिल्हाधिकारी वसुमना पंत, विधान परिषद आमदार सुधाकर अडबाले, महानगरपालिका आयुक्त अकुनुरी नरेश, अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, उपप्रादेशिक परिवहन सहाय्यक अधिकारी रावसाहेब रगडे, वाहतूक निरीक्षक बारापात्रे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कॉंग्रेस नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते.

# विंचूर येथे गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची बैठक संपन्न

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०४, विंचूर (नाशिक) :** आगामी गणेशोत्सव शांततेत, सुरक्षिततेत आणि सामाजिक सलोख्याच्या वातावरणात पार पडावा, यासाठी विंचूर येथील ज्येष्ठ नागरिक भवनमध्ये लासलगाव पोलीस प्रशासनाच्या वतीने शांतता समितीच्या विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत उत्सवाचे पावित्र्य राखत सर्व शासकीय नियमांचे काटेकोर पालन करणाऱ्या आणि शिस्तबद्ध कारभार ठेवणाऱ्या आदर्श गणेश मंडळांना लासलगाव पोलीस ठाण्याच्या वतीने विशेष बक्षीस देऊन सन्मानित करण्यात येणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आली.या बैठकीच्या अध्यक्षस्थानी लासलगाव पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सागर कोते होते. यावेळी पोलीस उपनिरीक्षक कैलास सोनवणे, ग्रामपंचायत प्रशासक सचिन दरेकर यांच्यासह गावातील विविध क्षेत्रांतील प्रमुख मान्यवर, शांतता समितीचे सर्व सदस्य आणि गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. विंचूर परिसरात यंदा एकूण ६९ सार्वजनिक गणेश मंडळे बाप्पाची प्रतिष्ठापना करणार असून, सर्वच मंडळांना सर्व शासकीय परवानग्या घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.

बैठकीत मार्गदर्शन करताना सागर कोते यांनी स्पष्ट केले की, मंडळांनी मंडप किंवा देखावे उभारताना मुख्य रस्त्यावरील पादचारी व वाहनचालकांना कोणताही त्रास होणार नाही आणि वाहतूक सुरळीत राहील याची प्राथमिक काळजी घ्यावी. तसेच मिरवणुका आणि उत्सवादरम्यान डीजेच्या वापरावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली असून ध्वनिक्षेपकांचा आवाज ७० डेसिबलच्या मर्यादेतच ठेवणे बंधनकारक राहील. शासनाच्या नियमांनुसार ठरवून दिलेल्या वेळेतच मिरवणुका काढाव्यात आणि ५ ते १० दिवसांच्या कालावधीत अधिकृत परवानगीनुसार शिस्तबद्ध पद्धतीने विसर्जन पूर्ण करावे, असे निर्देश



देण्यात आले. सुरक्षिततेचा भाग म्हणून बाप्पाच्या मूर्तीची कोणत्याही प्रकारे विटंबना होणार नाही याची दक्षता घेण्याचे आवाहन करण्यात आले. सोबतच चोरी आणि गैरप्रकार टाळण्यासाठी मूर्तीवर सोन्या-चांदीचे दागिने घालण्यास अथवा सोन्या-चांदीच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यास मनाई करण्यात आली आहे.

आरती किंवा पूजेदरम्यान कापूर, अगरबत्ती व दिव्यांमुळे आगीच्या दुर्घटना घडू नयेत, यासाठी मंडपामध्ये वाळू, पाणी व अग्निशामक यंत्रणा सज्ज ठेवण्याची सूचना करण्यात आली. याशिवाय सोशल मीडियावर जातीय, धार्मिक तेढ निर्माण करणारे मेसेज, वादग्रस्त स्टेटस अथवा आक्षेपार्ह फलक लावणाऱ्यांवर सायबर सेलच्या माध्यमातून थेट कायदेशीर कारवाई केली जाईल, असा सज्जड इशाराही देण्यात आला.

गणपती ही बुद्धीची आणि मंगल्याची देवता असल्याने हा लोकोत्सव केवळ स्पर्धा म्हणून न बघता सर्वांनी एकत्र येऊन सामाजिक एकात्मता आणि गावाचा नावलौकिक वाढवण्यासाठी साजरा करावा, असे भावनिक आवाहन पोलीस प्रशासनाच्या वतीने शेवटी करण्यात आले.

# कल्याण-डोंबिवलीकरांच्या वाहतूक कोंडीचा प्रश्न पेटला

## माजी आमदार भोईर यांनी घेतली MMRDA च्या मुख्य अभियंत्यांची भेट



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०४, शिळफाटा (ठाणे) :** कल्याण-डोंबिवलीकरांच्या दैनंदिन वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी माजी आमदार सुभाष भोईर यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणचे मुख्य अभियंता यतीन साखळकर यांची भेट घेऊन भोईर यांनी कल्याण-डोंबिवली आणि परिसरातील प्रलंबित रस्ते व उड्डाणपुलांच्या कामांबाबत ठोस निवेदन दिले.

**यावेळी भोईर यांनी ३ प्रमुख मागण्या लावून धरल्या -**

१. महापे रोड उड्डाणपूल तातडीने पूर्ण करा : मागील ४ वर्षांपासून रखडलेले महापे रोड उड्डाणपुलाचे काम तातडीने सुरू करून पूर्ण करण्याची मागणी त्यांनी केली.

२. कल्याण-शीळ रस्ता मोकळा करा : मेट्रोच्या कामांमुळे कल्याण-शीळ रस्त्यावर निर्माण झालेली तीव्र वाहतूक कोंडी तातडीने दूर करावी. चाकरमान्यांसह रुग्णवाहिकांना होणारा त्रास थांबवून वाहतूक सुरळीत करावी.

३. मुंब्रा बायपास ते कल्याण फाटा रस्त्याचे काँक्रिटीकरण : या मार्गावर अपघातांचे प्रमाण वाढले असून, अपघातांचा धोका कमी करण्यासाठी उर्वरित ‘साईड शोल्डर लेन’चे तातडीने काँक्रिटीकरण करावे.

> नागरिकांचा प्रवास सुरक्षित, सुरळीत आणि वेळेची बचत करणारा व्हावा, यासाठी या सर्व कामांचा मी सातत्याने पाठपुरावा करणार असून, ती मार्गी लावण्यासाठी कटिबद्ध आहे.
>
> **- सुभाष भोईर, माजी आमदार**

दरम्यान, या मागण्यांवर सकारात्मक विचार करून लवकरात लवकर कार्यवाही करण्याचे आश्वासन MMRDA प्रशासनाकडून देण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# थोडक्यात बातम्या

## शिस्त आणि राष्ट्रप्रेमातून व्यक्तिमत्व विकास - कर्नल प्रदीपकुमार बेहेरा

### ढोकेश्वर कॉलेजच्या एनसीसी युनिटला कमांडिंग ऑफिसरची भेट



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, पारनेर (अहिल्यानगर)** : अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संचलित श्री ढोकेश्वर महाविद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथील एनसीसी युनिटला १७ महाराष्ट्र बटालियन एनसीसी, अहिल्यानगरचे कमांडिंग ऑफिसर कर्नल प्रदीपकुमार बेहेरा यांनी दिनांक ०३ सप्टेंबर २०२६ रोजी सदिच्छा भेट दिली. प्रारंभी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.वीरेंद्र धनशेट्टी यांच्या हस्ते कर्नल बेहेरा यांचा ग्रंथ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी कर्नल बेहेरा यांनी एनसीसी कॅडेट्सशी संवाद साधला. एनसीसीमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, नेतृत्वगुण, राष्ट्रप्रेम, आत्मविश्वास आणि सामाजिक बांधिलकी निर्माण होते. यातूनच व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास साधला जातो, असे मार्गदर्शन त्यांनी केले.

या प्रसंगी एनसीसी अधिकारी लेफ्ट. डॉ.शांता गडगे, डॉ.विजय सुरोशी यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व एनसीसी कॅडेट्स मोठ्या संख्येने उपस्थित होते. कर्नल बेहेरा यांच्या भेटीमुळे कॅडेट्समध्ये चैतन्य व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडला.

## जनसेवेतून वाढदिवस; बाबाजी पाटील यांच्या उपक्रमात १००० नागरिकांना लाभ



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०४, पडले (ठाणे)** : बाबाजी बाळाराम पाटील नगरसेवक ठाणे महानगरपालिका, अध्यक्ष दि.ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. यांचा वाढदिवस आज शुक्रवार, दि.०४ सप्टेंबर २०२६ रोजी हॉटेल-पार्टीत खर्च न करता जनसेवेतून साजरा करण्यात आला. बी.के फाउंडेशन, तेरणा हॉस्पिटल व मनपा शिळ आरोग्य केंद्राच्या वतीने बी.के वॉटरपार्क, बाबाजी जनसंपर्क कार्यालय, कोकण किंग हॉटेलच्या बाजूला पडले-डायघर येथे सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत ५ उपक्रम राबवण्यात आले. MJPJAY व आयुष्यमान भारत अंतर्गत ECG, BP, शुगर, फुफ्फुस तपासणी, मोफत औषधे, मेडपास ॲपद्वारे सवलत व फर्स्ट एड किट, कॉम्प्युटर नेत्र तपासणी, मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया व चष्मे वाटप, दंत तपासणी करण्यात आली. सरस्वती विद्यामंदिर व पंचक्रोशीतील शाळांमधील १० वी, १२वी, पदवीच्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. ८०० ते १००० नागरिकांनी लाभ घेतला. नागरिकांसाठी पाणी, चहा-नाश्ता व फराळाची व्यवस्था होती. यावेळी आमदार राजेश मोरे, उपमहापौर रमाकांत मढवी, प्रभाग समिती अध्यक्ष दीपक जाधव, आदेश भगत, अर्चना पाटील यांच्यासह अनेक नेते व पंचक्रोशीतील नागरिक उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

## घरफोडीचा आरोपी पोलिसांच्या जाळ्यात;२८ हजाराचा मुद्देमाल जप्त



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०४, चंद्रपूर :** शहरातील छत्रपतीनगर, तुकूम परिसरात नवीन बांधकाम सुरू असलेल्या घरातून इलेक्ट्रिक साहित्य, मशिनरी व बांधकामासाठी लागणारे साहित्य चोरीला गेल्याच्या गुन्ह्याची स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी)उकल केली आहे. या प्रकरणात एका संशयित आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून, त्याच्याकडून सुमारे २८ हजार रुपये किमतीचा चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. दि. २८ ऑगस्ट २०२६ रोजी रात्रीच्या सुमारास छत्रपतीनगर, तुकूम, चंद्रपूर येथील नवीन बांधकाम सुरू असलेल्या घरातून अज्ञात चोरट्याने विविध इलेक्ट्रिक साहित्य, कटर मशीन, ग्राइंडर मशीन तसेच बांधकामासाठी उपयोगी साहित्य चोरून नेले होते. याप्रकरणी रामनगर पोलीस ठाण्यात अप.क्र.१०६०/२०२६ कलम ३०५ भारतीय न्याय संहिता (BNS) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने या प्रकरणाचा समांतर तपास सुरू केला. गोपनीय माहिती तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे संशयिताचा शोध घेत असताना ससुर उर्फ कोलकाता साहजन मंडल (वय ३९,रा. फुटनगर, चंद्रपूर मूळ रा.पश्चिम बंगाल) याच्याबाबत माहिती मिळाली.

मिळालेल्या माहितीच्या आधारे एलसीबी पथकाने त्यास ताब्यात घेत चौकशी केली. चौकशीदरम्यान मिळालेल्या माहितीनुसार त्याच्याकडून चोरीचा सुमारे २८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त करण्यात आलेल्या साहित्यामध्ये विविध कंपन्यांच्या ड्रिल मशीन, कटर मशीन, टायटन मशीन, रोटर मशीन, ग्राइंडर मशीन, दरवाज्याचे कब्जे तसेच इतर बांधकामासाठी उपयुक्त साहित्याचा समावेश आहे. आरोपीची वैद्यकीय तपासणी केल्यानंतर पुढील कायदेशीर कारवाई तसेच गुन्ह्याच्या सखोल तपासासाठी त्याला रामनगर पोलीस ठाणे, चंद्रपूर यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. या प्रकरणात आणखी काही बाबी समोर येतात का, याबाबत पोलिसांकडून तपास सुरू आहे.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक आयुष नोपानी व अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.कारवाईत सपोनि.योगेश हिवसे, पोउपनि. विनोद भुरले, पोउपनि. सुनील गौरकार, पोहवा.सतीश अवथरे, लागू यादव, इमरान खान, हिरालाल गुप्ता, संदीप कांबडी, पोअं.शशांक बदामवार, किशोर वाकाटे यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सहभाग घेतला.तसेच सायबर सेल, चंद्रपूर येथील पोहवा. कार्तिक खनके, पोअं.गुणवंत व अनिमेश यांनी तपासात सहकार्य केले.